| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | :- | २०/१०/२०२२ |
| नोंदणी दिनांक | :- | २०/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | :- | १३/१२/२०२३ |
| कालावधी | :- | व म दि<br>०१ ०१ २४ |

## भाग-'अ'

## (Title Page of the Judgment)

**(फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(i) नुसार)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.२, रिसोड यांचे न्यायालयात**

**(समक्षः श्रीमती प्रतिभा एम. कांबळे)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ३१५/२०२२ अपराध क्र. ०३७१/२०२२**

**CNR No. MHS08000254-2022 निशाणी क्र.५६**

**महाराष्ट्र शासन,**
मार्फत पोलीस स्टेशन, रिसोड,
जि. वाशिम. } ....**फिर्यादी**

**विरुध्द**

१. **सौ.सविता संजय घोडे,**
वय – ३८ वर्षे, धंदा –शेती/घरकाम,

२. **ग.भा.सत्यभामा कोंडुजी घोडे,**
वय – ६५ वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा. सवड, ता. रिसोड, जि. वाशिम. } ....**आरोपी**

---

दोषारोप–भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये.

---

---

उपस्थिती –श्री. आर.व्ही. तायडे – सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता
श्री. डि.व्ही. महाजन – आरोपींतर्फे विधिज्ञ
श्री. टी.एम. उंडाळ – मुळ फिर्यादीतर्फे विधिज्ञ

---

**भाग–'ब'**

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्ह्या घडल्याचा दिनांक | ०३/०७/२०२२ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | ०३/०७/२०२२ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २८/०९/२०२२ |
| ०४. | दोषारोप निश्चिती दिनांक | ०७/११/२०२३ |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०७/११/२०२३ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | निरंक |
| ०७. | न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/१२/२०२३ |
| ०८. | निकाल सुनावनीचा दिनांक | १३/१२/२०२३ |

**आ रो पी चा त प शि ल**

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ अंतर्गत भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.सविता संजय घोडे | – | ०८/०७/२०२२ | ३२४, ५०४ व ५०६ सह ३४ भा.दं.वी.अन्वये | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२. | ग.भा.सत्यभामा कोंडु जी घोडे | – | ०८/०७/२०२२ | ३२४, ५०४ व ५०६ सह ३४ भा.दं.वी.अन्वये | निर्दोष | – | – |

## भाग–क

## ( फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(iii) नुसार )

## सा क्षी दा रां ची या दी

### (अ) अभियोगपक्ष/सरकार पक्ष –

| अनु.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१. | सतिष परशराम गाडे | २३ | फिर्यादी |

### (ब) बचाव पक्षाचे आणि (क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर –

| अनु.क्र. | नांव सह कलम | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| — | — | — |

## कागदपत्रांची यादी न्यायालय निशाणी क्रमांक

### (ड) अभियोग पक्ष

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | जबानी रिपोर्ट | सही पुरता २४ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल | सही पुरता २५ |
| ०३. | घटनास्थळ पंचनामा | मान्य केला २५–ब |
| ०४. | जप्ती पंचनामा | – |
| ०५. | एक्स–रे रिपोर्ट | – |

| | | |
|---|---|---|
| ०६. | जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र | मान्य केला २५–अ |
| ०७. | जखमी फॉर्म | — |
| ०८. | फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी | वगळण्यात आले |

**(इ) मुद्देमाल तपशिल–**

| अनु.क्र. | साहित्य वस्तू | तपशिल |
|---|---|---|
| — | — | — |

---

**न्या य नि र्ण य**

(दिनांक १३/१२/२०२३ रोजी घोषित)

---

प्रस्तुत आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान (संक्षिप्त भा.द.वि.) कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी/खबरी नामे सतिष परशराम गाडे हा दि.०३.०७.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान तो त्याच्या शेतात काम करत असताना आरोपी त्याच्या शेतातुन जाणारा वहिवाटीच्या पाउल रस्त्याने जाताना एकदम फिर्यादीला शिवीगाळ केली. फिर्यादीने आरोपींना शिवीगाळ का करता असे विचारले असता आरोपी एकदम त्याच्या अंगावर धाउन गेले. आ.क्र.२ हिने त्याचे हात धरले, आ.क्र.१ हिने त्याच्या गालात चापट मारली व त्याच्या डाव्या बाजुच्या छातीवर चावा घेतला. आ.क्र.३ ने त्याला लोटुन दिले. सर्व आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी

दिली, अश्या आशयाची फिर्याद दिली.

३. सदर घटनेबाबत फिर्यादीने दिनांक ०३.०७.२०२२ रोजी पोलीस स्टेशन, रिसोड ता. रिसोड, जि.वाशिम येथे दाखल केलेल्या फिर्यादी वरुन गु.र.नं. ०३७१/२०२२ हा नोंदवण्यात आला. सदर अपराधाचा तपास तपासिक अंमलदार पो.हे.कॉ. प्रदिप रा. चव्हाण यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले व जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक केले. त्यानंतर तपासाअंती आरोपींविरुध्द भा.द.वि. ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ या कलमान्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द नि.१७ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींनी सदरचे दोषारोप नाकबूल केले व संपरिक्षेस सामोरे जाणार असल्याचे सांगितले. आ.क्र.३ हा बालक असल्याने त्याच्याविरुध्द मा.प्रमुख दंडाधिकारी, बाल न्यायालय, वाशिम यांच्या न्यायालयात वेगळे दोषारोपत्र दाखल केल्याचे या प्रकरणातील दोषारोपमध्ये नमुद केले आहे.

५. अभियोग पक्षातर्फे संपरिक्षादरम्यान साक्षीदार क्र.१ सतिष परशराम गाडे, (निशाणी २३) यांना तपासले. वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी २५–अ) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी २५–ब) हे आरोपीचे वतीने मान्य केले आहे. निशाणी २१ वर तडजोड लेख दाखल केला आहे. निशानी १ वरील आदेशानुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचा जबाब वगळण्यात आला. आरोपीने स्वतःचा कोणताही पुरावा दिलेला नाही व साक्षीदार तपासलेला नाही.

७. अभियोग पक्षातर्फे श्री आर.व्ही.तायडे सहाय्यक सरकारी आभियोक्ता व आरोपी तर्फे श्री डि.व्ही. महाजन यांचा युक्तिवाद ऐकला.

८. प्रस्तुत प्रकरणी निकाली काढत असताना अभियोग पक्षाची हकीकत,

साक्षी पुरावा व युक्तीवाद विचारात घेता माझे विचाराधीन खालील मुद्दे/वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | ०३.०७.२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी त्याच्या शेतात काम करीत असताना आरोपीने फिर्यादीस छातीवर डाव्या बाजुस चावा घेतला व स्वइच्छापूर्वक दुखापत केली व त्यायोगे भा.दं.वि. कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | वर नमूद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन उद्देशपूर्वक अपमान केला व त्यास प्रक्षोभित केले आणि त्या प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अपराध घडावा असा उद्देश होता व त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | वर नमूद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस क्षती/दुखापत पोहोचविण्याची धमकी दिली व त्याला भयभीत करण्याच्या दृष्टीने फौजदारी पात्र धाक दपटशहा केला व त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## – कारणमिमांसा –

९. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांनी युक्तिवादा दरम्यान आरोपीच्यावतीने वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले आहे, याचा विचार करता आरोपीने गुन्हा केल्याचे शाबीत होते असे प्रतिपादन केले. तर उलटपक्षी आरोपीचे विधिज्ञ श्री डि.व्ही. महाजन यांनी आरोपी हे निर्दोष असल्याचे प्रतिपादन करुन त्यांचे विरुध्द सबळ पुरावा आलेला नाही. अभियोग पक्षास फिर्यादी व साक्षीदारांनी सहकार्य केलेले नाही. त्यामुळे पुराव्या अभावी आरोपी हा निर्दोष असल्याचे युक्तिवादा दरम्यान सांगितले. प्रस्तुत न्यायनिर्णय कामी फिर्यादीच्या हकीकती अनुसार अभिलेखावरील उपलब्ध पुराव्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u> –**

१०. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकाच घटनेचा भाग असल्याने व पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे एकत्रीत विवेचन करण्यात आले आहे. मुद्दा क्र. १ मध्ये समाविष्ट असणारा महत्वाचा घटक इच्छापूर्वक दुखापत हा आहे, याची व्याख्या भारतीय दंड विधान कलम ३१९ मध्ये पुढीलप्रमाणे केली आहे –

> *कलम ३१९ – इच्छापूर्वक दुखापत पोहोचवणे – जर कोणी एखादी कृती केली असून त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत व्हावी असा त्याचा उद्देश असेल किंवा त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत पोहोचण्यास आपण कारण होण्याचा संभव आहे, अशी त्याला जाणीव असेल आणि त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला दुखापत पेहोचण्यास ती कारण झाला असेल, तर तो 'इच्छापूर्वक दुखापत पोहोचवतो' असे म्हटले जाते.*

या अनुषंगाने आरोपींनी इच्छापूर्वक दुखापत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन थापडा बुक्याने मारहान केली व अपमानीत केले आहे काय? हे पाहणे आवश्यक आहे.

११. याठिकाणी, फिर्यादी हा महत्वाचा साक्षीदार आहे. अभियोग पक्षाच्या वतीने नोंदविण्यात आलेल्या फिर्यादीच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, तो

आरोपींना ओळखतो. सदरची घटना त्याच्या शेतामध्ये घडली होती. त्याच्यात व आरोपीमध्ये फक्त बोलचाल झाली होती. याव्यतीरीक्त काही घडले नव्हते. फिर्यादीवरील सही तो मान्य करतो मात्र त्यातील मजकुराबाबत माहिती नसल्याचे कथन करतो. फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्याने आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसात केले आहे. त्याला आरोपीविरुध्द प्रकरण चालवायचे नाही.

१२. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने त्यास अभियोग पक्षातर्फे उत्तर सुचक प्रश्न विचारण्यात आले. त्या दरम्यान त्याने घटनेदिवशी व वेळी आरोपीने त्याला छातीवर चावा घेतल्याचे नाकारले आहे. फिर्यादी हा फिर्यादी मधील रेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविले असता त्याबाबत माहिती नसल्याचे सांगतो.

१३. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, फिर्यादी व साक्षीदार हे त्यांच्या अभियोग पक्षाच्या कथित कथनावर ठाम नाही. तो अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही. घटनेच्या दिवशी व वेळी आरोपीने फिर्यादीच्या छातीवर चावा घेतल्याचे तसेच फिर्यादीला शिवीगाळ, थापडा बुक्याने मारहान केली व दमदाटी केल्याचे फिर्यादी त्याच्या साक्षीपुराव्यात काही कथन करत नाही. तसेच, तो जखमेबाबत सुध्दा काहीही सांगत नाही. त्यामुळे, फिर्यादीमध्ये नमूद असल्याप्रमाणे कथित घटना घडले किंवा कसे याबाबत संशय निर्माण होतो.

१४. अभियोग पक्षातर्फे इतर साक्षीदार व तपासीक अंमलदार यांना तपासण्यात आलेले नाही. वैद्यकिय प्रमाणपत्र व घटनास्थळ पंचनामा आरोपीच्या वतीने मान्य करण्यात आले असले तरी फिर्यादी हा स्वतःच हे त्यास झालेल्या मारहाणीच्या कथित घटनेविषयी व जखमेबाबत साक्षीपुराव्यामध्ये काही कथन करीत नाही. त्यामुळे, वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमा ह्या आरोपीने केलेल्या मारहाणीमुळे झालेल्या आहेत, असे गृहीत धरता येणार नाही. फिर्यादी कथित घटना घडली असल्याचे स्पष्टपणे नाकारतो. फिर्यादी हा त्यांस झालेल्या शिवीगाळ व मारहाणीबाबत साक्षीपुराव्यामध्ये कथन करीत नाही. याठिकाणी, अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन फिर्यादीस आरोपीने छातीवर चावा घेवुन, शिवीगाळ केली व अपमानीत केले हे शाबीत होत नाही.

१५. एकंदरीत, अभिलेखावरील उपलब्ध पुरावा हा आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता पुरेसा नाही. साक्षीदार हा अभियोग पक्षास फितुर झाला आहे, त्यामुळे त्याची साक्ष अभियोग पक्षास पुरक व अनुकुल असल्याचे दिसुन येत नाही. अभियोग पक्षाने घेतलेल्या फिर्यादीच्या उलटतपासामधुनही अभियोग पक्षास मदत होण्याजोगे काही निष्पन्न झालेले नाही. खटल्यातील पुराव्याचे अवलोकन करता अभियोगपक्ष आरोपीवरील दोषारोप सिध्द करु शकलेला नाही.

१६. आरोपी व फिर्यादीमध्ये निशाणी क्रमांक २१ नुसार तडजोड झाल्याचे अभिलेखावर आलेले आहे. तसेच, फिर्यादीने त्याच्या साक्षी पुराव्यादरम्यान आरोपी व त्याच्यामध्ये तडजोड झाल्याचे मान्य करुन त्यास सदरचे प्रकरण चालविणे नसल्याचे सांगितले आहे.

१७. अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप हे निःसंशयरित्या शाबीत करणे आवश्यक आहे. अभियोग पक्ष आरोपीवरील दोषारोप निःसंशयरित्या शाबीत करण्यास पूर्णपणे अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाचे कथन व फिर्यादीचे न्यायालयातील साक्ष यामध्ये तफावत दिसून येते, त्यामुळे कथीत घटनेविषयी अस्पष्टता असुन अभियोग पक्षाच्या कथीत घटनेवर संशयाची सावली निर्माण होते. आरोपी व फिर्यादी मधील वाद मिटला असल्याने ते अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याचे दिसून येते. अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षापर्यंत आले आहे की, आरोपीवर ठेवलेले आरोप सिध्द् होत नाही व आरोपी हा निर्दोष होण्यास पात्र आहेत. सबब मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** –

१८. वरील विवेचनावरुन नोंदविण्यात आलेले निष्कर्ष हे फिर्यादी व अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार यांनी अभियोग पक्षास पाठींबा दिला नसल्यामुळे काढण्यात आले आहेत. तपासातील त्रुटी अथवा दोष याकरीता कारणीभुत नाहीत. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे आरोपीस प्रस्तुत खटल्यामधून दोषमुक्त

करणे न्यायोचित आहे. यास्तव मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) आरोपी क्र. ०१. दिपक सुभाष गवई आ.क्र. ०२ सुभाष नाथा गवई, रा. बोरखेडी ता. रिसोड जि. वाशिम याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान गुन्हा कलम ३२४, ५०४,५०६ व सहकलम ३४ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींची जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येतो, त्यास मुक्त करण्यात येते.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी रक्कम रु.७५००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन बंधपत्र द्यावा.

(पीठासनावरुन उदघोषित करण्यात आले.)

**सहि/–**

**(श्रीमती पी.एम. कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक :– १३/१२/२०२३. न्यायालय क्र.२, रिसोड.

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | P. P. Sonune, (Jr. Clerk) |
| Court | :- | J.M.F.C. Court No.2, Risod |
| Date | :- | 13/12/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 13/12/2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 13/12/2023 |